# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

No,CGRF/AZ/ AUR/ U / 226 / 2009 /60 Date :-

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,*
*Aurangabad.*

*Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Narayan Rangnath Vaidya,"SHREE" R-4, Amrut Residency, Vdant Nagar,Aurangabad. (Consumer no. 490011735841)*

*Dear Sir,*

*Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Forwarding of grievance in respect of Shri Narayan Rangnath Vaidya,"SHREE" R-4, Amrut Residency, Vdant Nagar,Aurangabad.*

*You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 14.07.2009 at 11= 30 Hrs .onwards.*

*Encl: As above*

*Member/Secretary*
*CGRF(AZ) MSEDCL*
*Aurangabad.*

*Copy to:-*
*Shri Narayan Rangnath Vaidya ,*
*"SHREE" R-4, Amrut Residency,*
*Vdant Nagar,Aurangabad.*

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२२६/२००९/६०**

**तक्रार दाखल दिनांक :- ३०/०६/२००९**
**निकाल दिनांक :- ३१/०७/२००९**

**श्री नारायण रंगनाथ वैद्य,**
**' श्री ' आर ४,**
**अमृत रेसिडेन्सी, वेदांतनगर,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११७३५८४१) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ३०/०६/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १४/०७/२००९ रोजी ठेवण्यात आली.

अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे.त्यांनी फेब्रुवारी २००८ पर्यंत देण्यात आलेल्या वीज बिलाचा भरणा केलेला आहे. मार्च २००८ मध्ये त्यांचे वीज मीटर बदलण्यात आले व त्यांना एप्रिल २००८ पासुन सरासरीवर आधारीत वाढीव बिल आकारण्यात आले. ऑगस्ट २००८ मध्ये त्यांना ४८५० युनीट वापराचे बिल आकारण्यात आले या चुकीच्या वीज बिलाबाबत त्यांनी महावितरणच्या अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार नोंदविली तेथे सुनावणी घेतल्यानंतर त्यांना कोणताही निकाल कळविण्यात आला नाही. त्यामुळे त्यांनी मंचात तक्रार दाखल केली असुन सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक १४/०७/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार गैरहजर होते.महावितरणचे नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर उपस्थित होते. त्यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला. अर्जदाराचे मीटर मार्च २००८ मध्ये ड्रम स्कीम अंतर्गत बसविण्यात आले व त्यावरील रिडींग प्रमाणे अर्जदारास बिल आकारणी करण्यात आल्याचे व ते योग्य असल्याचे म्हटले आहे. अर्जदार गैरहजर असल्यामुळे या प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक २१/०७/२००९ रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक २१/०७/२००९ रोजी अर्जदार श्री वैद्य उपस्थित होते. नोडल अधिकारी यांना महावितरण कंपनीच्या कर्मचा-यांचा संप असल्यामुळे सुनावणीची तारीख पुढे वाढवुन देण्याची विनंती केली. मंचाने पुढील सुनावणी दिनांक २४/०७/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

४) दिनांक २४/०७/२००९ रोजी अर्जदार श्री वैद्य तसेच नोडल अधिकारी श्री राठौर उपस्थित होते नोडल अधिका-यांनी पुर्वीच दाखल केलेल्या जवाबाची प्रत अर्जदारास देण्यात आली. अर्जदाराने त्यावर आपला जवाब दाखल केला. दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकुण घेतल्यानंतर नोडल अधिकारी यांना ग्राहकाचे स्थळ निरिक्षण अहवाल तसेच दिनांक ०१/०१/२००७ ते ३१/१२/२००७ ह्या कालावधीमधील सी.पी.एल. दाखल करण्याचे सांगुन पुढील तारखेस जुने बदली केलेले मीटर मंचासमोर दाखल करण्याचे सांगण्यात आले व पुढील तरीख दिनांक २८/०७/२००९ ठेवण्यात आली.

५) दिनांक २८/०७/२००९ रोजी अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी स्थळ निरिक्षण अहवाल व सी.पी.एल. पुढील तारखेस दाखल करण्यात येईल असे सांगितले. मंचाने दिनांक ३१/०७/२००९ पर्यंत वरील कागदपत्रे व अंतर्गत ग्राहणे निवारण मंचने दिलेल्या निकालाची प्रत सादर करण्याचे सांगुन प्रकरण निकालासाठी ठेवले.

६) मंचामध्ये दाखल करण्यात आलेल्या कागद पत्रावरुन असे लक्षात येते की, ग्राहकाची माहे फेब्रुवारी २००८ पर्यंत वीज बिलाबाबत कोणतीही तक्रार नव्हती दिनांक १२/०३/२००८ रोजी ग्राहकाचे मीटर (क्रमांक १४६३७८४) ड्रम प्रोजेक्ट अंतर्गत बदली करण्यात आले व त्या जागी नवीन मीटर क्रमांक (८३९५९४६) बसवण्यात आले.मीटर बदली अहवालानुसार जुन्या मीटरचे अंतीम वाचन ७९५४ व नविन मीटरचे सुरुवातीचे वाचन ०००२ दाखवण्यात आले आहे. वरील मीटर बदली अहवालाची नोंद सी.पी.एल.मध्ये माहे ऑगस्ट २००८ मध्ये घेऊन त्यांना एकुण ४८५० युनीट चे रुपये २३४८८.७८/-चे देयक देण्यात आले. त्याबाबत ग्राहकाने दिनांक ०८/१०/२००८ रोजी

महावितरणचे संबंधीत कार्यालयात तक्रार दाखल केली परंतु त्याची दखल न घेतल्यामुळे त्यांनी महावितरण कंपनीने स्थापन केलेल्या अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष यांच्याकडे ०५/०१/२००९ रोजी तक्रार दाखल केली अंतर्गत कक्षाने दिनांक ०७/०२/२००९ रोजी आदेश पारीत करुन महावितरण कंपनीने दिलेले माहे ऑगस्ट २००८ चे देयक मीटर रिडींगनुसार दिले असल्यामुळे योग्य असल्याचा आदेश पारीत केला. परंतु ग्राहकाने वरील आदेशाची प्रत प्राप्त झाली नसल्याचे कथन केले आहे.

(७) ग्राहकाचे सी.पी.एल. नुसार जुन्या मीटरचा माहे मार्च २००८ पुर्वीचा मागील ६ महीण्याचा वीज वापर २१६ युनीट असल्याचे आढळुन येते.तसेच नविन मीटरचा वीज वापर माहे मार्च २००८ ते सप्टेबर २००९ सुध्दा २३३ युनीट प्रतिमहा असल्याचे दिसुन येत आहे.ग्राहाकाने फेब्रुवारी २००८ पुर्वी दरमहा रिडींगनुसार देयकाचा भरणा केलेला आहे.त्यांचे माहे फेब्रुवारी २००८ चे रिडींग ४३१३ आहे व दिनांक १२/०३/२००८ रोजी बदली केलेल्या मीटरचे अंतीम वाचन ७९५४ नोंदविले आहे.त्यावरुन फक्त १२ दिवसात ७९५४-४३१३=३७४४ युनीटचा वापर आढळुन येतो जो संशयास्पद असल्यामुळे ग्राह्य धरता येते नाही ग्राहकाने मीटर बदली फॉर्मवर सही केली म्हणुन तेथे नोंदविलेले अंतीम वाचन योग्य आहे व ते ग्राहाकाने मंजुर केले आहे असे नोडल अधिकारी यांचे प्रतिपादन योग्य वाटत नाही नोडल अधिकारी यांना ग्राहकाचे जुने मीटर क्रमांक १४६३७८४ टेस्टींग करीता मंचास सादर करण्याबाबत वारंवार सुचीत केल्यानंतरही संबंधीत मीटर अथवा त्याचा चाचणी अहवाल, व स्थळ निरिक्षण अहवाल मंचासमोर सादर करण्यात आला नाही. करीता ग्राहकाची तक्रार मान्य करुन माहे ऑगस्ट चे देयक जुन्या व नवीन मीटर चा एक महीण्याचा सरासरी वीज वापर लक्षात घेऊन करावे असे ह्या मंचाचे मत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास दिलेले माहे ऑगस्ट २००८ चे देयक रद्द करण्यात येते आहे.त्या ऐवजी २२५ युनीट चे सरासरीवर आधारीत सुधारीत देयक देण्यात यावे.

२) सुधारीत देयक देतांना त्यावर व्याज व दंडाची आकारणी करु नये ग्राहकाने यापुर्वी भरलेल्या रक्कमेची वजावट करावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.


क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२२६/२००९/६० दिनांक :-

प्रति,

श्री नारायण रंगनाथ वैद्य,
' श्री ' आर ४,
अमृत रेसिडेन्सी, वेदांतनगर,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००११७३५८४१)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/२२६/२००९/६० )

आपण दिनांक ३०/०६/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती, सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.